# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## जाहीर आवाहन

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व नगरवासीयांना/नळ कनेक्शन धारकांना कळविण्यांत येते की, दि.३१/०३/२०२१ रोजी सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकीय मा.महासभे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत नळ कनेक्शन नियमीत करणे बाबत पाणी पुरवठा विभागाने धोरण निश्चित करून व्यापक स्वरूपात प्रसिध्दी दयावी व नागरीकांना अधिकृत नळ कनेक्शन करणेस उद्युक्त करावे. असा निर्णय झालेला आहे.

**अहमदनगर शहरात अनधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम राबविणे या अंतर्गत...**

अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांनी निर्देशीत कालावधीत निश्चीत केलेली रक्कम भरून नळ कनेक्शन नियमीत करणे.

| अ.क्र | कालावधी तपशिल | आकारणी रक्कम तपशील | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | चालु पाणी पट्टी | अनामत रक्कम | नळ जोडणी चार्जेस | सर्व्हीस चार्ज | दंडनीय आकार | एकुण रक्कम |
| १ | जुलै २०२१ पासुन दि.३१ ऑगस्ट २०२१ अखेर नियमीत केल्यास | १५००/- | १५००/- | ५००/- | २००/- | १०००/- | ४७००/- |
| २ | दिनांक ०१ सप्टेबर २०२१ पासून दि.३१ ऑक्टोबर २०२१ अखेर नियमीत केल्यास | १५००/- | १५००/- | ५००/- | २००/- | १५००/- | ५२००/- |
| ३ | दिनांक ०१ नोव्हेंबर २०२१ पासुन दि.३१ डिसेंबर २०२१ अखेर नियमीत केल्यास | १५००/- | १५००/- | ५००/- | २००/- | २०००/- | ५७००/- |

तसेच उपरोक्त कालावधी संपले नंतर म्हणजेच १ जानेवारी २०२२ पासून महानगरपालिके मार्फत मिळकत निहाय विशेष शोध मोहिम राबविण्यात येवून ज्या नागरिक नळ कनेक्शन अनधिकृत असल्याचे निदर्शनास येईल. त्यांचेकडून रू.३,७००/- + दंडनीय आकार रू.३०००/- याप्रमाणे एकूण रू. ६,७००/- वसूल करून त्यांचे विरूध्द थेट फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

वरील नमूद प्रमाणे महानगरपालिकेने घेतलेला निर्णय हा महानगरपालिकेच्या दृष्टीने पर्यायाने शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण व अनिवार्य आहे. करीता महानगरपालिका धोरणात्मक कामी सहकार्याचे आवाहन करित आहेत. वरील निर्णयाची अमंलबजावणी संबधीत प्रभाग अधिकारी/ प्रभाग कार्यालय यांचेमार्फत राबविण्यात येणार आहे.

तसेच सदर बाबत काही शंका असल्यास संबधीतांनी पाणी पुरवठा मुख्य कार्यालय, प्रभाग कार्यालय, प्रभाग अधिकारी, प्रभाग अभियंता यांचेशी संपर्क साधावा, असे जाहिर आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यांत येत आहे.

दिनांक१५/०७/२०२१
अहमदनगर

आयुक्त 15/7/2021
अहमदनगर महानगरपालिका